

**साडेतीन मुहूर्तांपैकी हा एक मुहूर्त**

सविस्तर वृत्त पान २ वर

www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -19, अंक-28 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, 16 मार्च 2026 ■ किंमत 2 रूपये, पाने -4

### छत्रपती संभाजीनगर रजिस्ट्री कार्यालयाचे बोगस दस्त नोंदणी पुराण...

# सहाय्यक दुय्यम निबंधक सय्यद रसूल यांची चौकशी सुरू

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

सडेतोड वृत्तपत्र अट्टल मतच्या दणक्याने सहायक दुय्यम निबंधक सय्यद रसूल यांची चौकशी सुरू असल्याची माहिती सह. जिल्हा निबंधक विवेक गांगुर्डे यांनी 'अट्टलमत'ला दिली. यावेळी बोलताना विवेक गांगुर्डे म्हणाले की, आम्ही सय्यद रसूल यांच्या चौकशीचे पत्र काढले आहे. त्यावर सखोल चौकशी होवून कडक कारवाई करण्यात येईल. तसेच सत्य जनतेसमोर येईल. चौकशी संदर्भात तक्रारदारास व आम्हाला माहितीस्तव आपण पत्र दिले पाहिजे होते असे विचारले असता विवेक गांगुर्डे म्हणाले की, पुढील आठवडयात सर्व चित्र स्पष्ट होईल. त्यामुळे त्यांनी तसे पत्र देण्याचीही तसदी घेतली नाही. दोषी व भ्रष्ट अधिकाऱ्यांवर आम्ही नियमाअंतर्गत कारवाई करू, असे विवेक गांगुर्डे यांनी सांगितले.

**अट्टलमतचा दणका**

चौकशी करण्यासाठी जे काही महत्त्वपूर्ण कागदपत्रांची आवश्यकता होती ती सर्व पुरावे अट्टलमतने आपल्या वृत्तपत्रात प्रसारित केली आहे. अधिकारी चालढकलपणा करत असल्याचे लक्षात येताच अट्टलमतने पुरावे असल्याचे वृत्त छापले. त्यावर कारवाई देखील करत असल्याचे विवेक गांगुर्डे यांनी तोंडी सांगितले. प्रत्येक वेळी हेच अधिकारी कागदाचा आधार घेतात परंतु जेव्हा त्यांची वेळ येते तेव्हा मात्र आखडता हात घेतला जात असल्याचे दिसून आले. यावेळी विवेक गांगुर्डे यांच्या बातचित करताना अट्टलमतच्या प्रतिनिधीने सांगितले की, बोगस दस्त नोंदण्या तर झालेल्या आहेत. त्याचे पुरावे ही दिलेले आहेत. परंतु यात संशयाची पाल चुकचुकते ती अशी की, खरेदी करणाऱ्या ग्राहकांच्या जमिनीपासून व घरापासून दस्त नोंदणी कार्यालय हे १५ ते २० कि.मी. अंतरावर तर दुसरे २० ते २५ कि.मी. अंतरावर आहे. तरी देखील तो सोयगाव येथे १२० कि.मी. लांब असलेल्या दस्त नोंदणी कार्यालयातच का गेला?.जरी राज्यात कोणत्याही कुठेही मालमत्तेची खरेदी करता येवू शकते. हे खरे असले तरी मग ही नों दणी करणे याच अधिकाऱ्याच्या हातून होणे का आवश्यक होते. यापूर्वी ही ग्राहक अन्य कोणाकडेही ते करू शकला असता. परंतु जे कोणाला जमत नाही ते संभाजीनगरच्या अधिकाऱ्यांना सहज जमते. ग्राहकाला माहिती होते. त्यामुळे या संबंधीत जो सहाय्यक दुय्यम निबंधक अधिकारी बदलीवर आला आहे तो भ्रष्ट आहे आणि तोच आपले काम करू शकतो. त्याला अव्वाच्या सव्वा रक्कम देवून तसेच शासनाचा लाखो रूपयांचा महसूल बुडवून दस्त नोंदणी केली जावू शकते. असे विवेक गांगुर्डे यांना सांगितल्यावर ते म्हणाले की, हो हे जरा संशयास्पद आहे.

# चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांवर मा. अधिष्ठाता व प्रशासकीय अधिकारी यांची दमदाटी थांबवा

**प्रहार जनशक्ती पक्ष पक्षाच्यावतीने कर्मचारी संघटनेचे शहराध्यक्ष राजेंद्र पोहाल यांची मागणी**

## महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष मा. शेरसिंग डागोर यांना राजेंद्र पोहाल यांच्यावतीने निवेदन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथील सर्व चतुर्थश्रेणी कर्मचारी यांच्यावर होत असलेल्या अन्याय-अत्याचारासंदर्भात सांगण्यात येते की. मा. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे आणि प्रशासकीय अधिकारी दिलीप गोदणे हे मागील काही वर्षांपासून लाडपागे संदर्भात कोणतीही भरती आतापर्यंत करण्यात आलेली नाही आणि तसेच लाडपागे उमेदवारांची यादी लावण्यात आली आहे त्याच्यामध्ये फार मोठा गोंधळ करण्यात आला आहे. लाडपागे उमेदवारांच्या यादीकडे लक्ष द्यावे. याच्यासह अन्य मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष मा. शेरसिंग डागोर यांना प्रहार जनशक्ती पक्ष पक्षाच्यावतीने कर्मचारी संघटनेचे शहराध्यक्ष राजेंद्र पोहाल यांनी निवेदन दिले. याप्रसंगी विलास जगताप यांच्यासह कर्मचारी व समाज बांधवांची उपस्थिती होती.



तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथे मागच्या महिन्यात सरळसेवा पद्धतीने ३५७ जागांसाठी ऑनलाईन परिक्षा घेण्यात आल्या आणि ते विद्यार्थी उच्च शिक्षण घेतलेले असल्यामुळे ते पास झाले आणि त्यांचे मा. पालकमंत्री यांच्या हस्ते १९१ उमेदवारांचे नियुक्तीपत्र वाटण्यात आले. त्यावेळी मा. जिल्हाधिकारी तसेच अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, प्रशासकीय अधिकारी दिलीप गोदणे हे उपस्थित होते. ज्या उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्यात आले ते नियुक्ती पत्र वर्ग-४ चे होते. वर्ग-४ म्हणजे आणि त्यांचे काम स्वच्छतागृह साफ-सफाई तसेच रूग्णालयातील जेवढे काही साफ-सफाईचे काम असतील ते वर्ग-४ चे आहे. परंतु मा. अधिष्ठाता साहेब यांनी नियुक्ती पत्रात असे नमूद केले आहे की, या सर्व उमेदवारांना स्वच्छतागृह व साफ-सफाईचे कामे वगळून दुसरे काम देण्यात यावे. अन्यथा जे अधिकारी नवीन उमेदवारांना साफ-सफाईचे काम सांगतील त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. यासाठी दि. ०६/०३/२०२६ रोजी आपल्या संस्थेत सरळसेवेत भरती करण्यात आलेल्या उमेदवारांच्या कामांच्या संदर्भात दोन तास काम बंद आंदोलन करण्यात आले होते आणि मा. अधिष्ठाता साहेबांना निवेदन देण्यात आले होते की, येणाऱ्या आठ दिवसामध्ये जर या लोकांनी जुने वर्ग-४ चे लोक ज्या परीने काम करतात त्याच परीने नवीन वर्ग-४ च्या उमेदवारांना देखील काम करावे लागेल. अन्यथा दि. २३/०३/२०२६ रोजी मा. सहसंचालक कार्यालय, वैद्यकीय शिक्षण संशोधन, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयासमोर काम बंद आंदोलन करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी आणि तसेच लाडपागे समितीच्या शिफारसीनुसार जे १६५ उमेदवार राखीव आहे. आज त्या १६५ उमेदवारांवर त्यांच्या परिवाराचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. आज त्यांची परिस्थिती फार हलाखीची झालेली आहे. त्रस्थ उमेदवार प्रशासकीय अधिकारी दिलीप गोदणे यांच्याकडे विचारपूस करण्यासाठी गेलो असता अरेरावीची भाषा व उद्दट वागणूक देण्यात येते. त्यामुळे १६५ उमेदवार हे परेशान आहे. त्यासाठी ते आपल्याकडे सहानुभूतीपूर्वक न्याय मिळावा, ही आपल्याकडे अपेक्षा. तसेच चतुर्थश्रेणी कर्मचारी निवासस्थानाकडे मा. अधिष्ठाता साहेबांचा दुर्लक्ष आहे. कारण की निवासस्थानाच्या कामामध्ये त्यांना काही टक्केवारी भेटत नाही त्यामुळे ते चतुर्थश्रेणी यांच्या निवासस्थानाकडे कानाडोळा करत आहे. याची आपण अती गांभीर्याने दखल घ्यावी. जेणेकरून चतुर्थश्रेणी कर्मचारी यांचा परिवाराचा आरोग्याचा प्रश्न सुटेल.

# पत्रकारांनी 'एआय'कडे कौशल्यवृद्धीची संधी म्हणून पहावे - प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

पत्रकारितेत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)चा वापर झपाट्याने वाढत असला तरी एआयला वास्तव सम जण्याची क्षमता नसते, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. सत्य शोधण्याची जबाबदारी आणि समाजाचा विश्वास हे पत्रकारितेचे मूलभूत बळ असल्यामुळे बदलत्या तंत्रज्ञानाच्या काळातही पत्रकारितेची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे, असे मत महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी व्यक्त केले. पत्रकारांनी एआयकडे धोका म्हणून न पाहता कौशल्यवृद्धीची संधी म्हणून पाहावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित 'एआय परिषद २०२६'चे उद्घाटन महासंचालक श्री. सिंह यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी एआयमुळे पत्रकारितेच्या क्षेत्रात होणारे बदल, संधी आणि आव्हाने यावर सविस्तर भाष्य केले. यावेळी संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर, राजेंद्र हुंजे, विश्वस्त देवदास मटाले, अजय वैद्य, कार्यवाह शैलेंद्र शिर्के आदी यावेळी उपस्थित होते.

श्री. सिंह म्हणाले, मानव इतिहासात ज्ञान लोकांपर्यंत पोहोचण्याची प्रक्रिया छपाई तंत्रज्ञानाच्या शोधानंतर मोठ्या प्रमाणावर बदलली. पूर्वी ज्ञान काही विशिष्ट गटांपुरते मर्यादित होते; मात्र छपाईमुळे ते सर्वसामान्यांपर्यंत पोहोचले. त्यानंतर प्रसारमाध्यमांचा विकास झाला. दूरदर्शन सुरू झाले तेव्हा वृत्तपत्रांना धोका वाटत होता; डिजिटल माध्यमे आली तेव्हा टीव्हीला धोका वाटू लागला. मात्र या सर्व बदलांनंतरही वृत्तपत्रांनी आपले अस्तित्व टिकवले. भविष्यातही पत्रकारिता टिकेल, मात्र जे काही काम स्वयंचलित होऊ शकते ते एआयमुळे स्वयंचलित होणार हेही वास्तव आहे, असे त्यांनी नमूद केले.

आज पत्रकारितेत एआयचा वापर वाढत आहे. जगात काही ठिकाणी पूर्णपणे स्वयंचलित 'वन-मॅन न्यूज रूम' तयार होत असून बातम्यांचे संकलन, लेखन, संपादन, फॅक्ट-चेकिंग आणि पेज लेआउटसारखी कामे एआयच्या साहाय्याने केली जात आहेत. वित्त, क्रीडा आदी अनेक क्षेत्रांतील बातम्या मोठ्या प्रमाणावर स्वयंचलित पद्धतीने तयार होऊ शकतात. त्यामुळे पत्रकारितेतील कामकाजाची पद्धत बदलत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

तुमची नोकरी एआय घेणार नाही; पण एआय वापरणारा दुसरा माणूस तुमची नोकरी घेऊ शकतो. त्यामुळे पत्रकारांनी एआय कौशल्ये आत्मसात करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी पत्रकारांना एआयचे प्रशिक्षण देण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या पुढाकारातून लवकरच 'एआय इन जर्नलिझम' हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्याचा विचार असल्याचेही श्री. सिंह यांनी यावेळी सांगितले.

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानामुळे ज्ञान निर्मिती, प्रसार आणि वापराची संपूर्ण पद्धत झपाट्याने बदलत आहे. पत्रकारितेतील अनेक कामे ही स्वयंचलित होत आहेत. भविष्यातही अनेक कामे स्वयंचलित (ऑटोमेटेड) होणार असली, तरी पत्रकारितेमधून सत्यता मांडण्याची जबाबदारी मात्र मानवी बुद्धिवरच राहणार आहे. त्यामुळे एआयमुळे पत्रकारितेचे स्वरूप बदलणार असले, तरी पत्रकारितेचे मूलभूत बळ म्हणजे विश्वास असून सत्यता, विश्वास आणि संपादकीय जबाबदारी ही पत्रकारितेची मूलभूत तत्त्वे कायम राहणार आहेत, असे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले. एआयमुळे बातम्या रिअल-टाईम, गतिमान आणि वैयक्तिकृत (हायपर पर्सनलाइज्ड) होत असल्याचेही त्यांनी सांगितले. आजच्या अटेन्शन इकॉनॉमी मध्ये वाचकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी विविध प्लॅटफफॉर्मवर वेगवेगळ्या स्वरूपात सामग्री सादर केली जात आहे.

काही विदेशी वृत्तसंस्था एकाच बातमीचे अनेक पर्याय तयार करून वेगवेगळ्या वाचकगटांना पाठवतात आणि कोणता प्रकार प्रभावी ठरतो याचा अभ्यास करतात, अशी माहितीही प्रधान सचिव तथा महासंचालक श्री. सिंह यांनी यावेळी दिली.

# सध्या लोकसभेत काय चालले आहे? – गोंधळाचा सखोल आढावा

भारतीय लोकशाहीची सर्वात महत्त्वाची संस्था म्हणजे संसद. संसदेमध्ये जनतेचे प्रतिनिधी एकत्र येऊन देशाच्या धोरणांवर चर्चा करतात, सरकारला प्रश्न विचारतात आणि कायदे तयार करतात. संसदेमधील लोकसभा हे सर्वात महत्त्वाचे सभागृह मानले जाते, कारण ते थेट जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी बनलेले असते. मात्र गेल्या दोन–तीन महिन्यांपासून लोकसभेचे कामकाज वारंवार गोंधळ, घोषणाबाजी आणि राजकीय संघर्षामुळे विस्कळीत होत असल्याचे दिसून येत आहे. बजेट अधिवेशनाच्या काळात अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर सरकार आणि विरोधकांमध्ये तीव्र संघर्ष झाला आहे. या परिस्थितीचा सर्व बाजूंनी विचार करणे आवश्यक आहे.

सर्वप्रथम लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे संसद सध्या बजेट अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात आहे. या अधिवेशनात अर्थसंकल्पावरील चर्चा, विविध विधेयकांवर चर्चा आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर सरकारला प्रश्न विचारले जातात. परंतु प्रत्यक्षात गेल्या काही आठवड्यांत लोकसभेचे कामकाज अनेक वेळा गोंधळामुळे स्थगित करण्यात आले आहे. काही दिवस तर सभागृह सुरू झाल्यानंतर काही मिनिटांतच कामकाज थांबवावे लागले. विरोधी पक्षांनी अनेक मुद्द्यांवर सरकारला लक्ष्य केले असून सरकारनेही विरोधकांच्या आरोपांना तीव्र उत्तर दिले आहे. गेल्या काही आठवड्यांत सर्वात मोठा वाद निर्माण झाला तो ऊर्जा आणि एलपीजी पुरवठ्याच्या प्रश्नावर. पश्चिम आशियातील तणाव आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे इंधन पुरवठ्यावर परिणाम होत असल्याची चर्चा सुरू झाली. या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षाने देशात एलपीजी सिलेंडरची कमतरता असल्याचा मुद्दा संसदेत उपस्थित केला. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी संसद परिसरात आंदोलन करून सरकारकडून स्पष्ट उत्तर मागितले. त्यांचा आरोप होता की सरकार देशातील ऊर्जा सुरक्षेबाबत योग्य नियोजन करण्यात अपयशी ठरत आहे. या मुद्द्यावर संसदेत तीव्र घोषणाबाजी झाली आणि काही वेळा कामकाज स्थगित करावे लागले.

या चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारवर टीका करत भारताच्या ऊर्जा धोरणावर प्रश्न उपस्थित केले. त्यांनी असे म्हटले की भारताला परकीय दबावामुळे काही निर्णय घ्यावे लागत आहेत का, यावर संसदेत खुली चर्चा व्हायला हवी. या वक्तव्यामुळे सभागृहात मोठा गोंधळ निर्माण झाला. काही सदस्यांनी त्यांच्या वक्तव्याला तीव्र विरोध केला आणि संसदीय नियमांचा मुद्दा उपस्थित केला. परिणामी सभापतींना हस्तक्षेप करावा लागला आणि काही वेळासाठी चर्चा थांबवावी लागली. दुसरा महत्त्वाचा वाद निर्माण झाला तो लोकसभेच्या सभापतीविरुद्ध आणलेल्या अविश्वास प्रस्तावावर. विरोधी पक्षातील काही सदस्यांनी असा आरोप केला की सभापती सभागृहाचे संचालन करताना पूर्णपणे तटस्थ राहात नाहीत. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव मांडण्यात आला. या प्रस्तावावर संसदेत दीर्घ चर्चा झाली आणि सरकारच्या बहुमतामुळे तो प्रस्ताव अखेर फेटाळण्यात आला. मात्र या चर्चेदरम्यानही सभागृहात तीव्र वाद आणि घोषणाबाजी झाली. तिसरा मुद्दा म्हणजे निवडणूक आयोगाच्या कामकाजावरून झालेला वाद. पश्चिम बंगालमध्ये मतदार यादीच्या पुनरावलोकन प्रक्रियेवरून विरोधी पक्षातील काही सदस्यांनी संसदेत प्रश्न उपस्थित केले. त्यांनी निवडणूक आयोगाच्या भूमिकेबद्दल शंका व्यक्त केली आणि या विषयावर संसदेत चर्चा व्हावी अशी मागणी केली. या मुद्द्यावरही विरोधी पक्षाने आंदोलन केले आणि सरकारने त्याला राजकीय हेतू असल्याचा आरोप केला. याशिवाय काही दिवसांपूर्वी विरोधी पक्षाच्या काही खासदारांचे निलंबन हा देखील मोठा वादाचा विषय ठरला. सभागृहात गोंधळ घातल्याचा आरोप करून काही सदस्यांना उर्वरित अधिवेशनासाठी निलंबित करण्यात आले. विरोधी पक्षाने या कारवाईला ङ्गलोकशाही आवाज दडपण्याचा प्रयत्नङ्ग असे म्हटले, तर सरकारने ती कारवाई नियमांनुसार असल्याचे सांगितले. या संपूर्ण परिस्थितीकडे सरकार आणि विरोधक या दोन्ही बाजूंनी वेगवेगळ्या पद्धतीने पाहिले जाते. सरकारचा दावा असा आहे की संसदेत चर्चा करण्यासाठी पुरेसा वेळ दिला जातो आणि विरोधकांनी मुद्दाम गोंधळ घालून कामकाज अडवले आहे. सरकारच्या नेत्यांचे म्हणणे आहे की जर विरोधक खरोखरच गंभीर चर्चेला तयार असतील तर त्यांनी नियमांनुसार चर्चा करावी आणि घोषणाबाजी टाळावी. काही मंत्र्यांनी असेही म्हटले आहे की विरोधक संसदेत कमी बोलतात आणि नंतर बाहेर आरोप करतात. दुसरीकडे विरोधी पक्षाचा आरोप असा आहे की सरकार महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा टाळते. त्यांचे म्हणणे आहे की इंधन संकट, आंतरराष्ट्रीय परिस्थिती, शेतकरी प्रश्न, रोजगार आणि आर्थिक धोरण यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सरकारने स्पष्ट भूमिका मांडली पाहिजे. विरोधी पक्षाचे नेते असेही म्हणतात की संसदेत प्रश्न विचारणे हा त्यांचा घटनात्मक अधिकार आहे आणि त्या अधिकारावर मर्यादा येत असल्याची त्यांना भीती आहे. तटस्थ दृष्टीने पाहिले तर या संघर्षामागे केवळ संसदीय नियमांचा प्रश्न नाही, तर त्यामागे मोठा राजकीय संघर्ष आहे. आगामी निवडणुका, आर्थिक परिस्थिती आणि आंतरराष्ट्रीय घडामोडी यामुळे राजकीय वातावरण अधिक तापलेले आहे. अशा परिस्थितीत संसदेमध्ये वाद होणे स्वाभाविक आहे. परंतु वारंवार कामकाज स्थगित होणे ही लोकशाहीच्या दृष्टीने चिंतेची बाब मानली जाते. संसदीय तज्ज्ञांच्या मते संसदेत गोंधळ वाढण्यामागे तीन मुख्य कारणे आहेत. पहिले म्हणजे राजकीय ध्रुवीकरण वाढले आहे. दुसरे म्हणजे माध्यमे आणि सामाजिक माध्यमांमुळे राजकीय विधानांना अधिक महत्त्व मिळते. तिसरे म्हणजे संसदीय चर्चेपेक्षा राजकीय संदेश देण्यावर अधिक भर दिला जातो. या कारणांमुळे संसद कधी कधी राजकीय संघर्षाचे मैदान बनते. अखेरीस असे म्हणता येईल की सध्या लोकसभेत सुरू असलेला गोंधळ हा केवळ एका घटनेचा परिणाम नाही, तर अनेक राजकीय आणि धोरणात्मक प्रश्नांचा परिणाम आहे. ऊर्जा धोरण, आर्थिक करार, निवडणूक प्रक्रिया, संसदीय परंपरा आणि राजकीय स्पर्धा या सर्व मुद्द्यांचा यात समावेश आहे. लोकशाहीची ताकद टिकवायची असेल तर सरकार आणि विरोधी पक्ष या दोघांनीही संसदेच्या मंचावर संवाद साधणे आवश्यक आहे. प्रश्न विचारणे आणि त्यांना उत्तर देणे हीच लोकशाहीची खरी ताकद आहे. संसदेत खुली, शांत आणि विधायक चर्चा झाली तरच देशातील लोकशाही अधिक मजबूत होईल.

**– डॉ. भारत कऱ्हाड,**
प्राचार्य, वराडकर महाविद्यालय
दापोली, जिल्हा रत्नागिरी.

# साडेतीन मुहूर्तांपैकी हा एक मुहूर्त

**गुढीपाडवा हा एक भारतीय सण असून तो हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदेला महाराष्ट्रात साजरा केला जातो. शालिवाहन संवत्सराचा हा पहिला दिवस आहे. वेदांग ज्योतिष या ग्रंथात सांगितलेल्या साडेतीन मुहूर्तांपैकी हा एक मुहूर्त आहे. या दिवशी नवीन वस्तू खरेदी, व्यवसाय प्रारंभ, नव उपक्रमांचा प्रारंभ, सुवर्ण खरेदी इत्यादी गोष्टी केल्या जातात. दारी उभारलेली गुढी हे विजय आणि समृद्धीचे प्रतीक आहे असे मानले जाते. गुढी पाडव्यापासूनच राम जन्मोत्सवाच्या कार्यक्रमाचासुद्धा प्रारंभ होतो. ब्रह्मदेवाने या दिवशी विश्व निर्मिले, असे सांगितले आहे. श्रीराम अयोध्येला परत आले. प्रभू रामचंद्रांनी चौदा वर्षे वनवास भोगून लंकाधिपती रावण व राक्षसांचा पराभव करून या दिवशीच अयोध्येत प्रवेश केला. शालिवाहन नावाच्या कुंभाराच्या मुलाने शकांचा पराभव करण्यासाठी सहा हजार मातीच्या सैनिकांचे पुतळे तयार केले व त्यात प्राण घालून त्यांच्या साह्याने याच दिवशी शकांचा पराभव केला अशी आख्यायिका प्रचलित आहे. याच शालिवाहन राजाच्या नावाने नवीन कालगणना शालिवाहन शक चालू झाला. चैत्र शुद्ध प्रतिपदेला प्रात:काळी ओवा, मीठ, हिंग, मिरी आणि साखर कडुनिंबाच्या पानांबरोबर वाटून खातात. पचनक्रिया सुधारणे, पित्तनाश करणे, त्वचा रोग बरे करणे,धान्यातील कीड थांबवणे हे आणि असे अनेक औषधी गुण ह्या कडुनिंबाच्या अंगी आहेत असे आयुर्वेदात मानले जाते. शरीराला थंडावा देणाऱ्या कडूनिंबाची पाने अंघोळीच्या पाण्यात घालणे, ती वाटून खाणे हे आरोग्याच्या दृष्टीने हितकारक समजले जाते**

**प्राचीन** मानवाने जेव्हा देवाची कल्पना केली आणि पूजा करायला सुरवात केली तीच देवीच्या, स्त्रीच्या रूपात सुरु केली. ती स्त्री म्हणजे आदिशक्ती, आदिमाता पार्वती असे मानले जाते. पार्वती आणि शंकराचे लग्न पाडव्यादिवशी ठरले. पाडव्यापासून तयारीला सुरवात होऊन तृतीयेला लग्न झाले. पाडव्यादिवशी पार्वतीच्या शक्तिरूपाची पूजा करतात. यालाच चैत्र नवरात्र म्हणतात. लग्नानंतर नवमीला योगिनींची अधिपती म्हणून पार्वतीची अभिषेक झाला.

काश्मिरी मुलींना पार्वतीचे रूप असे श्रीकृष्णाने म्हटले आहे. पार्वती लग्न झाले की माहेरवाशिणी म्हणून महिनाभर माहेरी राहते. तेव्हा तिच्या कौतुकासाठी चैत्रगौरीचे हळदीकुंकू केले जाते. अक्षयतृतीया यादिवशी ती सासरी जाते. संदर्भ– शक्रोत्सवाचे उल्लेख संस्कृत रघुवंशात व भासांचे 'मध्यमव्यायोग', शूद्रकाचे 'मृच्छकटिकम्' या नाटकांमध्ये आले आहेत.

ध्वजांचे पौराणिक उल्लेख

प्रतिमाविद्या (आयकॉनोग्राफी)च्या अनुषंगाने झालेल्या अभ्यासाच्या दृष्टीने इंद्रध्वज व ब्रह्मध्वज कसे दिसत याबद्दल उपलब्ध वर्णने फ़ारच कमी वाटतात. जी वर्णने उपलब्ध आहेत त्यांच्यांतही आपआपसांत फ़रक आहे. त्यांमध्ये इतर ध्वजप्रकारांशी सरमिसळही केली गेली आहे असेही दिसते.

रामायण, महाभारत आणि पुराणे असोत, अथवा नाटके, इंद्रध्वजाचे उल्लेख मुख्यत्वे उपमा अलंकाराच्या स्वरूपात आलेले दिसतात. नायकांना इंद्रध्वजाची उपमा दिलेली दिसतेच पण युद्धांमध्ये धारातीर्थी पडणाऱ्या शत्रुपक्षाच्या नायकासपण इंद्रध्वजाची उपमा दिलेली दिसून येते.

श्रीरामाने रावणावर विजय मिळवून ज्या दिवशी अयोध्येत पुन्हा प्रवेश केला त्या दिवशी, म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदेला नागरिकांनी गुढ्या उभारून उत्सव साजरा केला, अशी पारंपरिक समजूत आहे.

गुढी शब्दाची उकल – तेलुगू भाषेत गुढी या शब्दाचा अर्थ 'लाकूड अथवा काठी' असा आहे तसाच तो 'तोरण' असाही आहे. दाते, कर्वे लिखित 'महाराष्ट्र शब्दकोशा'चा आधार घेतला तर

**गुढ्या घालुनी वनीं राहूं ,**
**म्हणा त्यातें । – प्रला १९ (?)**

असे उदाहरण येते यातील गुढ्या या शब्दाचा अभिप्रेत अर्थ त्या शब्दकोशाने खोपटी, झोपडी, अथवा पाल (रहाण्याची जागा) असा दिला आहे.




पण आंध्रशी घनिष्ट संबंध असलेल्या शालिवाहन राजघराण्याच्या लाकूड बांबू/ काठी या अर्थाने तो वापरात राहिला असण्याची शक्यता असू शकते.

काठीपूजन तसेच उत्सवी काठी ही मानवी इतिहासात विविध समुदायात केली गेलेली एक प्राचीनतम पूजा–परंपरा आहे.

इस्रायलमधील अशेराह पोल या काठी पूजा परंपरा ज्यू धर्माच्या स्थापनेपूर्वीच्या काळात प्रचलित पूजन पद्धती होत्या. युरोपात नॉर्वेजियातील चर्च उत्खननामध्ये काठीपूजेच्या परंपरेचे दाखले मिळालेले दिसतात, युरोपातील मेपोल हा काठी उत्सव ख्रिश्चनपूर्व काळापासून ख्रिश्चन धर्मीय विरोधाचा सामना करीत साजरा करताना दिसतात.

पॅसिफ़िक क्षेत्रात माओरी मिथकातून 'व्हाकापोकोको आतुआ' नावाने शेती–पिकांचा देव रोंगोची पूजा होत आली आहे. कुक बेटांवरील आदिवासी 'आतुआ राकाऊ' नावाने काठीपूजा करतात. चीनच्या युनान प्रांतातील मिआओ आणि अनशूनमधील येलांग संस्कृती, व्हिएतनाम मधील 'के न्यू', कोरियातील 'जाँगशाँग' आणि 'सोटडे',म्यानमार देशातील 'के होते बो' उत्सव ही जगाच्या पाठीवर वेगवेगळ्या ठिकाणी साजऱ्या झालेल्या अथवा होत आलेल्या काठी उत्सवांची अथवा पूजांची उदाहरणे आहेत.

अमेरिका खंडात देवक–स्तंभाच्या स्वरूपात प्राचीन काठ्यांचे वा स्तंभांचे जतन केले जाते.

भारतीय उपखंडात नेपाळमध्ये काठी उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होतो, आसाममध्ये काही समुदाय वैशाख महिन्यात 'बास पूजा' साजरी करतात, त्रिपुरा आणि मणिपूर राज्यांत काठी उत्सव परंपरा दिसून येतात; तसेच बलुचिस्तानच्या हिंगलाज देवीस काठी सोबत यात्रेने जाण्याची प्रथा आहे. राजस्थानात गोगाजी मंदिर येथे व म ध्यप्रदेशातील निमाड प्रांतात काठी मातेची पूजा आणि काठी नृत्याची परंपरा आहे.

महाराष्ट्रात गुढीपाढव्याशिवाय जतरकाठी, काठीकवाडी, नंदीध्वज हे काठी–उत्सव साजरे केले जातात. डॉ. बिद्युत लता रे यांच्या मतानुसार ओरिसा राज्याच्या आदिवासींमध्ये खंबेश्वरी देवीची पूजा हा काठी पूजेचा प्रचलित प्रकार असून खंबेश्वरीची पूजा अर्वाचीन काळात हिंदू धर्मात उत्क्रांत झालेल्या मूर्तिपूजांपेक्षा प्राचीन असावी.

**गुढीपाडवा – पूजा पद्धती**

संवत्सर फ़ल म्हणजे काय? तर त्या पाडव्यापासून जे संवत्सर म्हणजे वर्ष सुरू होत असते, त्या वर्षाच्या पहिल्या दिवशी आणि नंतरच्या काही विशिष्ट दिवशी असणारी स्थिती – जसे वार, चंद्र, नक्षत्र, सूर्याचे विविध नक्षत्रप्रवेश इत्यादी संदर्भांवरून हे संवत्सर फ़ल दिलेले असते. संवत्सर फ़लात देशकालाचाही निर्देश असतो, म्हणजे देशाच्या कोणत्या भागात सुखसमृद्धी असेल ते संवत्सर फ़लात त्रोटकपणे सांगितलेले असते. वर्षप्रतिपदेच्या म्हणजे गुढीपाडव्याच्या दिवशी जो वार असेल त्या वाराचा जो ग्रह असेल तो त्या संवत्सराचा अधिपती असे मानले जाते.

म्हणजे आजपासून सुरू होणारे वर्ष हे जर मंगळवारी सुरू होत असेल तर मंगळ हा त्या वर्षाचा अधिपती असे समजले जाते. साठ संवत्सरांची वेगवेगळ्या पद्धतीने विभागणी केली आहे. एका विभागणीत पाच संवत्सरांचे एक युग अशा पद्धतीने साठ संवत्सरांची बारा युगे मानली जातात.

तसेच संवत्सर चक्रातील ८ व्या भाव नावाच्या संवत्सरापासून विजय या २७ व्या संवत्सरापर्यंत २० संवत्सरांचा स्वामी पालनकर्ता विष्णू आहे असे मानले जाते. ब्रह्मदेवाने पहिली तिथी सर्वात श्रेष्ठ म्हणून घोषित केली. तिला पहिले पद मिळाल्याने ती 'प्रतिपदा' म्हणून ओळखली जाते असे मानले जाते. या तिथीला 'युगादी' तिथी असेही म्हणतात.

या दिवशी उपाध्यायाकडून पंचांग श्रवण म्हणजेच वर्षफ़ल श्रवण करतात. या पंचांग श्रवणाचे फळ असे सांगितले आहे.:– तिथीच्या श्रवणाने लक्ष्मी लाभते. वाराच्या श्रवणाने आयुष्य वाढते. नक्षत्र श्रवणाने पापनाश होतो. योगश्रवणाने रोग जातो. करणश्रवणाने चिंतिलेले कार्य साधते. असे हे पंचांग श्रवणाचे उत्तमफल आहे. त्याच्या नित्य श्रवणाने गंगास्नानाचे फल मिळते.

# राजे शहाजी महाविद्यालयात महिला दिन उत्साहात साजरा




**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

कृषी व ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित राजे शहाजी महाविद्यालय, एव्हरग्रीन इंग्लिश स्कूल व एस.बी. पब्लिक स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात माँसाहेब जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. यावेळी कृषी व ग्रामीण विकास प्रतिष्ठानमध्ये कार्यरत महिलांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला संस्थेचे कार्यकारी संचालक गणेश बनकर पाटील उपस्थित होते. त्यांनी मार्गदर्शन करताना आज प्रत्येक क्षेत्रात महिला यशाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचत असल्याचे सांगून सर्व महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीदादा बनकर पाटील होते. समारोप करताना त्यांनी राजकारण, क्रीडा, उद्योग, शिक्षण, विज्ञान आणि कला अशा सर्व क्षेत्रांत महिलांनी उत्तुंग भरारी घेतल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इस्रो सहल निवड चाचणीत जि.प. प्राथमिक शाळा सुदामवाडीची ऐतिहासिक कामगिरी

## मयुरी पवार जिल्ह्यात प्रथम; श्रावणी सोनवणे चौथी



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

जिल्हा परिषदेच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा आणि अंतराळ संशोधनाविषयी आवड निर्माण व्हावी या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या इस्रो सहल निवड चाचणी परीक्षेत जि. प. आदर्श प्राथमिक शाळा सुदामवाडीच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले. या परीक्षेत शाळेची विद्यार्थिनी मयुरी मच्छिंद्र पवार हिने १०० पैकी ९४.५ गुण मिळवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला, तर श्रावणी बाळासाहेब सोनवणे हिने ८९.५ गुणांसह जिल्ह्यात चौथा क्रमांक मिळिवला.

जिल्हा परिषदेतर्फे निवड झालेल्या २७ विद्यार्थ्यांना विमान प्रवासाने बेंगळुरू येथील इस्रोच्या मुख्यालयाला शैक्षणिक सहल नेण्यात येणार आहे. या निवड प्रक्रियेसाठी प्रथम केंद्रस्तरावर परीक्षा घेण्यात आली होती. यात सुदामवाडी शाळेचे १० पैकी ७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते. त्यानंतर झालेल्या तालुकास्तरीय परीक्षेत बहुपर्यायी प्रश्नांसह निबंध स्पर्धा घेण्यात आली. या टप्प्यातही शाळेच्या सात विद्यार्थ्यांपैकी तीन विद्यार्थिनी यशस्वी ठरल्या. अंतिम जिल्हास्तरीय परीक्षा बळीराम पाटील हायस्कूल, छत्रपती संभाजीनगर येथे पार पडली. या परीक्षेत ७५ गुणांचे बहुपर्यायी प्रश्न, १० गुणांचे विज्ञान प्रात्यक्षिक, १० गुणांचे गणित प्रात्यक्षिक आणि ५ गुणांची तोंडी परीक्षा असा एकूण १०० गुणांचा पेपर होता. यात देवकी पंढरीनाथ जाधव हिनेही ८३.५ गुण मिळवत उल्लेखनीय यश मिळवले. या यशासाठी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी हेमंत उशीर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच केंद्रप्रमुख ढमाले सर, माजी वर्गशिक्षिका ज्योती निकम, सुनील सोनवणे, सध्या कार्यरत वर्गशिक्षक संतोष पैठणकर, तसेच अनिता आढाव, सीमा आठरे, जयश्री पवार, रामजी फलके, माजी शिक्षक प्रशांत सूर्यवंशी आणि रविभाऊ अनर्थे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य तसेच ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने विद्यार्थ्यांचा आणि शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संतोष पैठणकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत सर्व शिक्षकांनी एकत्रितपणे गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रयत्न केल्यास विद्यार्थ्यांना जिल्हा व राज्यस्तरावर स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवणे शक्य होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सीमा आठरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन रविभाऊ अनर्थे यांनी केले.

# संत रविदास अध्ययन केंद्र खाक केल्याप्रकरणी आरोपींना अटक करा; गाडे कुटुंबाच्या पुनर्वसनाची मागणी



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील दौलावडगाव येथे संत रविदास अध्ययन केंद्र तसेच रविदासाचार्य गोपीनाथ गाडे यांचे घर व दुकान जाळण्याच्या घटनेतील आरोपींना तात्काळ अटक करून कडक शिक्षा करावी तसेच गाडे कुटुंबाचे तातडीने पुनर्वसन करण्यात यावे, अशी मागणी चर्मकार समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात विशेष पोलीस महानिरीक्षक, विभागीय आयुक्त तसेच मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, छत्रपती संभाजीनगर येथे निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, रविदासाचार्य गोपीनाथ गाडे हे संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांच्या समतावादी विचारांचा प्रसार करणारे सामाजिक कार्यकर्ते असून ते बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील दौलावडगाव येथे सामाजिक व धार्मिक कार्य करीत आहेत. त्यांच्या माध्यमातून संत रविदास महाराजांचे विचार समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी संत रविदास अध्ययन केंद्र सुरू करण्यात आले आहे. मात्र काही दिवसांपासून दौलावडगाव येथील काही जातीयवादी प्रवृत्तीच्या गावगुंडांकडून गाडे कुटुंबाला सातत्याने त्रास देण्यात येत होता. त्यांना गावातून हुसकावून लावण्यासाठी धमक्या देणे व मानसिक छळ करण्याचे प्रकार सुरू होते. यासंदर्भात अंभोरा पोलीस ठाण्यात संबंधित आरोपींविरुद्ध यापूर्वीही गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

असे असताना दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री काही जातीयवादी गुंडांनी संगनमताने गोपीनाथ गाडे यांचे घर, दुकान तसेच संत रविदास महाराज अध्ययन केंद्र यांना आग लावून जाळून टाकले. या भीषण घटनेत घरातील साहित्य, कागदपत्रे व संपूर्ण इमारत जळून खाक झाली असून सुमारे ५० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सुदैवाने त्या वेळी गाडे कुटुंब बाहेरगावी असल्यामुळे जीवितहानी टळली. या प्रकरणी अंभोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असला तरी घटनेला जवळपास पंधरा दिवस उलटूनही आरोपी अद्याप मोकाट फिरत असल्याने समाजात तीव्र संताप व्यक्त होत आहे. त्यामुळे संबंधित आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, जलदगती न्यायालयात खटला चालवून कडक शिक्षा करावी, तसेच संत रविदास अध्ययन केंद्र व गाडे कुटुंबाचे घर-दुकान पुन्हा बांधून देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच शासनाने तातडीने आर्थिक मदत जाहीर करून गाडे कुटुंबाला पोलीस संरक्षण द्यावे आणि शासनाच्या जीआरप्रमाणे कुटुंबातील एका व्यक्तीस शासकीय नोकरीत समाविष्ट करावे, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दरम्यान, वरील मागण्या पूर्ण न झाल्यास चर्मकार समाजाच्या वतीने सोमवार दिनांक १६ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे.

यावेळी अखिल भारतीय गुरु रविदास परिवर्तन सेनेचे प्रदेश सचिव प्रवीण बोर्डे, ज्येष्ठ समाजसेवक सुरेश गवळी, ॲड. संतोष बारसे, कॅप्टन बाजीराव सोनवणे, गणेश भाग्यवान, प्रल्हाद पाचारे, रमेश शेगोकार, डी. पी. बनसोडे, संजय वाडेकर आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चेअरमन सुजित कुमार सिंग यांच्या वाढदिवसानिमित्त

# श्रेया लाईफ सायन्सेसतर्फे रक्तदान शिबिर

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

श्रेया लाईफ सायन्सेस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे आदरणीय चेअरमन सुजित कुमार सिंग यांच्या वाढदिवसानिमित्त कंपनीत सामाजिक उपक्रम राबवत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला कंपनीतील अधिकारी, कर्मचारी तसेच स्टाफ सदस्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या प्रमाणात रक्तदान केले.

संजिवनी ब्लड सेंटर, छत्रपती संभाजीनगर यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात सुमारे ८० ते ८५ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. या वेळी संजीवनी ब्लड सेंटरचे डॉक्टर व वैद्यकीय कर्मचारी उपस्थित राहून रक्तदान प्रक्रिया पार पाडली.

विशेष म्हणजे या उपक्रमात कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांनीही उत्साहाने सहभाग घेत रक्तदान केले, त्यामुळे या सामाजिक उपक्रमाचे विशेष कौतुक करण्यात आले. समाजासाठी काहीतरी देण्याच्या भावनेतून चेअरमन सुजित कुमार सिंग यांच्या वाढदिवसानिमित्त हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याचे कंपनीच्या व्यवस्थापनाने सांगितले. या रक्तदान शिबिरामुळे अनेक गरजू रुग्णांना मदत होणार असून उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत भविष्यातही असे सामाजिक उपक्रम राबवावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

संजय विटोरे, मनोजकुमार चौरासिया, नंदकिशोर दास, अरविंदकुमार गौतम, गोपाळ कुलकर्णी, ओंकार लौलकर, उत्तम दास, प्रभू कल्याने, गौतम दामोदर, रामदास भागवत, विकास शेळके, वसंत राजगुरू आदींची उपस्थिती होती.



# किडनी दात्यांच्या निःस्वार्थ योगदानाला सलाम; कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये विशेष कार्यक्रम

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

वर्ल्ड किडनी डे २०२६ निमित्त कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या नेफ्रोलॉजी विभागातर्फे गुरुवार, १२ मार्च २०२६ रोजी कमलनयन बजाज हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर येथील नर्सिंग कॉलेज ऑडिटोरियममध्ये विशेष जनजागृती व किडनी दात्यांचा सत्कार कार्यक्रम उत्साहात आयोजित करण्यात आला.

किडनीचे आरोग्य, किडनीच्या आजारांचे प्रतिबंध, किडनी प्रत्यारोपण तसेच अवयवदानाचे महत्त्व याबाबत जनजागृती करण्यासाठी आणि किडनी दात्यांच्या निःस्वार्थ योगदानाचा गौरव करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८:३० वाजता झाली. यामध्ये योग सत्र, वृक्षारोपण उपक्रम, उद्घाटन समारंभ, पोस्टर सादरीकरण, किडनी आरोग्यावरील तज्ञांचे मार्गदर्शनपर सत्र, किडनी दात्यांसाठी प्रश्नमंजुषा व टॅलेंट उपक्रम, किडनी दात्यांचा सत्कार तसेच आरोग्य तपासणी शिबिर अशा विविध उपक्रमांचा समावेश होता. कार्यक्रम ानंतर सहभागींसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजीनगरचे पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड उपस्थित होते, तर विशेष पाहुणे म्हणून छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे महापौर मा. समीर गजुंदर उपस्थित होते.

या प्रसंगी कमलनयन बजाज हॉस्पिटलचे वरिष्ठ मान्यवर व डॉक्टर उपस्थित होते. त्यामध्ये डॉ. जॉर्ज फर्नांडिस (सीईओ), डॉ. अजय रोटे (मेडिकल डायरेक्टर), डॉ. मिलिंद वैष्णव (डायरेक्टर – रिसर्च अँड अकॅडेमिक्स), डॉ. समीर महाजन (कन्सल्टंट नेफ्रोलॉजिस्ट व किडनी ट्रान्सप्लांट फिजिशियन) आणि डॉ. निखिल इंगळे यांचा समावेश होता.

या उपक्रमाचा भाग म्हणून हॉस्पिटलतर्फे सहभागींसाठी मोफत प्राथमिक आरोग्य तपासणी आणि तज्ञांचे मार्गदर्शनही उपलब्ध करून देण्यात आले. यामुळे सामाजिक आरोग्यसेवा आणि जनजागृतीबाबत हॉस्पिटलची बांधिलकी अधोरेखित झाली.

## अवयवदानाबाबत जनजागृतीसाठी कटिबद्ध

“ कमलनयन बजाज हॉस्पिटलचे सीईओ डॉ. जॉर्ज फर्नांडिस म्हणाले, वर्ल्ड किडनी डे हा किडनी दात्यांच्या असामान्य धैर्याचा सन्मान करण्याचा आणि नव्या आशेचा गौरव करण्याचा क्षण आहे. कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये आम्ही नेहमीच अशा उपक्रमांना प्रोत्साहन देतो आणि प्रतिबंधात्मक किडनी आरोग्यसेवा देणे तसेच अवयवदानाबाबत जनजागृती करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

कन्सल्टंट नेफ्रोलॉजिस्ट व किडनी ट्रान्सप्लांट फिजिशियन डॉ. समीर महाजन म्हणाले, या कार्यक्रमात किडनी दात्यांचा सन्मान करण्याबरोबरच विविध उपक्रमांमध्ये त्यांच्या सक्रिय सहभागावर विशेष भर देण्यात आला. वृक्षारोपण, आरोग्य तपासणी, ट्रान्सप्लांट प्रीमियर लीग, किडनी प्रश्नमंजुषा आणि डोनर गॉट टॅलेंट यांसारख्या उपक्रमांमधून किडनी दातेही निरोगी आणि सामान्य जीवन जगू शकतात हा सकारात्मक संदेश देण्यात आला.

**मेडिकल डायरेक्टर डॉ. अजय रोटे म्हणाले,**

या कार्यक्रमाद्वारे किडनी प्रत्यारोपणामुळे मिळालेल्या जीवनाच्या नव्या संधींचा उत्सव साजरा करण्यात आला आणि किडनी दात्यांचे धैर्य, प्रेम आणि उदारता यांचा गौरव करण्यात आला.

**डायरेक्टर – रिसर्च अँड अकॅडेमिक्स डॉ. मिलिंद वैष्णव म्हणाले,** या कार्यक्रमाने रुग्ण, त्यांच्या कुटुंबीय आणि सर्वसामान्य नागरिकांना लवकर निदानाचे महत्त्व, प्रतिबंधात्मक किडनी आरोग्यसेवा आणि अवयवदानाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

या कार्यक्रमाला किडनी दाते, रुग्ण, त्यांचे कुटुंबीय तसेच नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सुमारे ३०० पेक्षा अधिक किडनी प्रत्यारोपण रुग्ण या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यामुळे वर्ल्ड किडनी डे २०२६ निमित्त आयोजित हा उपक्रम अत्यंत अर्थपूर्ण आणि संस्मरणीय ठरला.







# भोगवाटा-२ जमिनींच्या नोंदणीत अनियमितता; अधिकाऱ्यावर कारवाईची ‘भिमशक्ती’ची मागणी

**शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडाल्याचा आरोप; अधिकाऱ्यावर कारवाईची मागणी**

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

शहरातील रजिस्ट्री कार्यालयातील सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग-२ चे अधिकारी आर. पी. राठोड यांनी आपल्या शासकीय पदाचा गैरवापर करून भोगवाटा २ (वर्ग-२) जमिनींच्या बेकायदेशीर दस्त नोंदणी केल्याचा गंभीर आरोप करत त्यांच्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी भिमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत अप्पर तहसीलदार यांना लेखी तक्रार निवेदन देण्यात आले असून चौकशी करून संबंधित दस्त नोंदणी रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.



भिमशक्ती सामाजिक संघटनेचे शहर जिल्हाध्यक्ष सतीश नरवडे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, छत्रपती संभाजीनगर येथील रजिस्ट्री कार्यालय नेहमीच विविध कारणांनी चर्चेत असते. कार्यालयात दलालांचा सुळसुळाट असून त्यांच्या इशाऱ्यावर अनेक कामे केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सहाय्यक दुय्यम निबंधक कार्यालय क्रमांक २ मधील अधिकारी आर. पी. राठोड यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून आर्थिक स्वार्थापोटी भोगवाटा २ (वर्ग-२) जमिनींची सक्षम प्राधिकाऱ्यांची परवानगी न घेता अनेक दस्त नोंदणी केल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

या प्रकरणामुळे मुद्रांक विभाग तसेच जिल्ह्यातील महसूल प्रशासनाची फसवणूक झाली असून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडाल्याचा आरोपही करण्यात आला आहे. यापूर्वीही बेकायदेशीर दस्त नोंदणी प्रकरणी त्यांच्यावर वरिष्ठ कार्यालयाकडून कारवाई झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आशिर्वादामुळे अशा प्रकारच्या बेकायदेशीर कामांना पाठबळ मिळत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार ५०९०, ७२९८, १२३३, २३४, २४१, १०२, १२४३१, १२४३०, १२४४०, १२०१८, १२०१७, ११९४७, ११९५६, १९२२, १२०४३, ९०८४, ११९०५, ११६८०, ५०१०, १२१४०, ११६८८, ८९६५, १२४७२, १८७३ आदी दस्त नोंदणी भोगवाटा २ (वर्ग-२) जमिनींच्या सक्षम प्राधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी न घेता करण्यात आल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील विविध कलमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

भोगवाटा २ (वर्ग-२) जमिनींचे हस्तांतरण करण्यासाठी जिल्हाधिकारी किंवा तहसीलदार यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असते. तसेच अधिमूल्य (नजराणा) भरल्याशिवाय अशा जमिनींची विक्री किंवा हस्तांतरण करता येत नाही. परवानगीशिवाय झालेल्या व्यवहारांना कायदेशीर मान्यता नसून संबंधित जमीन शासन जमा करण्याची तरतूद कायद्यात असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४३, ६३-ख, १५७ आणि २९ नुसार परवानगीशिवाय केलेले व्यवहार अवैध ठरतात आणि संबंधितांवर दंडात्मक कारवाई होऊ शकते. अशा प्रकारे नियमांचे उल्लंघन करून दस्त नोंदणी केल्यामुळे शासनाची फसवणूक झाल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून सहाय्यक दुय्यम निबंधक आर. पी. राठोड तसेच संबंधित दस्त लिहून देणारे व लिहून घेणारे यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी आणि सदर बेकायदेशीर दस्त नोंदणी रद्द कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणातील आणखी अनेक बेकायदेशीर दस्त नोंदणीची माहिती पुढील चौकशीत उपलब्ध करून देण्यात येईल, असेही संघटनेने नमूद केले आहे. याबाबत येत्या १५ दिवसांत कारवाई न झाल्यास संघटनेच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. निवेदन देताना भिमशक्ती सामाजिक संघटनेचे शहर जिल्हाध्यक्ष सतीश नरवडे, मराठवाड्याचे नेते मधुकर दादा नगराळे, युवा नेते स्वप्निल नरवडे, अॅड. पी. पी. कारेगावकर यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको, औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199